SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART TWO

(असाधारण)

शनिवार, दिनांक २ जानेवारी, २०२१

अधिसूचना

क्रमांक : ०१/२०२१ दिनांक : ०२.०१.२०२१

विषय :- २०२१-२२ या शैक्षणिक सत्राचे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून संलग्नीकरण अर्ज (Online) भरण्याबाबतच्या अंतिम तिथीबाबत..

संदर्भ : विद्यापीठ निदेश क्र. १६/२०२०, दि. १२.१०.२०२०

ज्याअर्थि, उपरोक्त संदर्भांकीत निदेशान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ३७(१)(ट) प्रमाणे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करण्याबाबतची तरतूद आहे. सदर तरतुदीस अनुसरून अधिष्ठाता मंडळाने विद्याविषयक लेखापरिक्षण मानके व कार्यप्रणाली तयार केली असून, विद्यापीठाच्या प्राधिकारीणीने त्याला मान्यता प्रदान केली आहे व त्याअनुषंगाने निदेश क्र. १६/२०२०, दि. १२.१०.२०२० निर्गमित करण्यात आला आहे.

आणि

ज्या अर्थी, ज्या महाविद्यालयाचे विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखेचे संलग्निकरण संपलेले आहे. अशा महाविद्यालयांनी सत्र २०२१-२२ पासून विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करावयाचे आहे. याकरीता सॉफ्टवेअरच्या माध्यमातून संबंधीत पात्र महाविद्यालयांनी संलग्नीकरण अर्ज (Online) भरावयाचे आहेत. सदर (Online Portal) दि. ६.१.२०२१ ते २१.१.२०२१ पर्यंत सुरू राहील. निदेश क्र. ३९/२००४, दि. २०.१०.२००४ नुसार संलग्निकरण शुल्क भरण्यात यावे.

अर्ज (Online) भरण्यास खालील पद्धतीचा वापर करण्यात यावा.

१. www.sgbau.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाणे.
२. Online Service वर क्लिक करणे.
३. Online Application for Continuation of Affiliation वर क्लिक करणे.
४. Login करताना प्रथम Register वर क्लिक करून स्वतःच्या महाविद्यालयाची नोंदणी करून घेणे.
५. नोंदणी केलेल्या महाविद्यालयांनी सरळ Login करावे.
६. Continuation of Affiliation वर Click करावे.
७. अर्ज भरताना अडचण आल्यास मो.नं. ९५२७०५०६१७ / ७२४९४१९०४० /०७२१-२५६६२४५ या दुरध्वनी नं. वर संपर्क करून माहिती मिळविता येईल.

स्वा./-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ